# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

## UG- 11.12 द्वितीय सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।

उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

एकादशः स्कन्धः

अथ द्वादशोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

न रोधयति मां(यँ) योगो, न सां(ङ्)ख्यं(न्) धर्म एव च ।
न स्वाध्यायस्तपस्त्यागो, नेष्टापूर्तं(न्) न दक्षिणा ॥ 1॥
व्रतानि यज्ञश्छान्दां(म्)सि, तीर्थानि नियमा यमाः ।
यथावरुन्धे सत्सं(ङ्)गः(स्), सर्वसं(ङ्)गापहो हि माम् ॥ 2॥

श्रीभगवान म्हणतात- सर्व आसक्ती नष्ट करणाऱ्या सत्संगामुळे भक्त मला जसा प्राप्त करू शकतो, तसा योग, सांख्य, धर्म, स्वाध्याय, तप ,त्याग इष्ट, आपूर्त, दक्षिणा,व्रते, यज्ञ, तीर्थे, नियम, यम इत्यादी साधनांनी मला मिळवू शकत नाही.

सत्सं(ङ्)गेन हि दैतेया, यातुधाना मृगाः(ख्) खगाः ।
गन्धर्वाप्सरसो नागाः(स्), सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥ 3॥
विद्याधरा मनुष्येषु , वैश्याः(श्) शूद्राः(स्) स्त्रियोऽन्त्यजाः ।
रजस्तमः(फ्) प्रकृतयस्- तस्मिं(म्)स्तस्मिन् युगेऽनघ ॥ 4॥
बहवो मत्पदं(म्) प्राप्तास्- त्वाष्ट्रकायाधवादयः ।
वृषपर्वा बलिर्बाणो, मयश्चाथ विभीषणः ॥ 5॥
सुग्रीवो हनुमानृक्षो, गजो गृध्रो वणिक्पथः ।
व्याधः(ख्) कुब्जा व्रजे गोप्यो, यज्ञपत्न्यस्तथापरे ॥ 6॥

हे पुण्यशील उद्धवा! प्रत्येक युगामध्ये सत्संगाच्या योगाने दैत्य-राक्षस, पशु- पक्षी गंधर्व, अप्सरा ,नाग ,सिद्ध, चारण, गुह्यक आणि विद्याधरांना माझी प्राप्ती झालेली आहे. मनुष्यामध्ये वैश्य, शूद्र, स्त्री, अत्यंज इत्यादी रजोगुणी- तमोगुणी स्वभावाच्या पुष्कळशा जीवांनी माझे परमपद प्राप्त करून घेतले आहे. वृत्रासुर, प्रल्हाद, वृक्ष, परवा, बली, बाणासुर मतदान , विभीषण, सुग्रीव ,हनुमान, जांबवान, गजेंद्र ,जटायु, तुलाधार, वैश्य, धर्मव्याध, कुब्जा, व्रजातील गोपी यज्ञपत्न्या आणि इतर अनेक जण सुद्धा सत्संगाच्या प्रभावानेच मला प्राप्त करू शकले.

ते नाधीतश्रुतिगणा, नोपासितमहत्तमाः ।
अव्रतातप्ततपसः(स्), सत्सं(ङ्)गान्मामुपागताः ॥ 7॥

त्यांनी वेदाध्ययन केले नव्हते की महापुरुषांची उपासना केली नव्हती. त्याचप्रमाणे त्यांनी कोणतेही व्रत किंवा तपश्चर्या सुद्धा केली नव्हती. केवळ सत्संगाने ते मला येऊन मिळाले.

केवलेन हि भावेन, गोप्यो गावो नगा मृगाः ।
येऽन्ये मूढधियो नागाः(स्), सिद्धा मामीयुरञ्जसा ॥ 8॥

गोपी गाई यमलार्जुन इत्यादी वृक्ष, व्रजातील हरीण इत्यादी पशु, या सर्वांनी भक्तीनेच मला प्राप्त करून घेतले. याखेरीज कालिया नागासारखे अज्ञानी केवळ प्रेमभावनेने सहजपणे मला मिळून कृतकृत्य झाले.

यं(न्) न योगेन सां(ङ्)ख्येन, दानव्रततपोऽध्वरैः ।

व्याख्यास्वाध्यायसं(न्)न्यासैः(फ्), प्राप्नुयाद् यत्नवानपि ॥ 9॥

उद्धवा,; प्रयत्नशील साधक योग,सांख्य, दान, व्रत, तपश्चर्य, यज्ञ, वेदाध्ययन, स्वाध्याय, संन्यास इत्यादी साधनांच्या द्वारे ज्या मला प्राप्त करून घेऊ शकत नाही ते सत्संगाने माझी प्राप्ती करून घेतात.

रामेण सार्धं(म्) मथुरां(म्) प्रणीते,

श्वाफल्किना मय्यनुरक्तचित्ताः ।

विगाढभावेन न मे वियोग-

तीव्राधयोऽन्यं(न्) ददृशुः(स्) सुखाय ॥ 10॥

उद्धवा! ज्यावेळी अक्रूर बलरामदादासह मला वज्रातून मथुरेला घेऊन निघाला, त्यावेळी माझ्याविषयीच्या गाढ प्रेमामुळे माझ्या ठिकाणीच चित्त जडलेल्या गोपी माझ्या योगाच्या तीव्र दुःखाने इतक्या व्याकुळ झाल्या होत्या की, माझ्याखेरीज दुसरी कोणतीही वस्तू त्यांना आनंददायक वाटत नव्हती.

तास्ताः(ह) क्षपाः(फ्) प्रेष्ठतमेन नीता,

मयैव वृन्दावनगोचरेण ।

क्षणार्धवत्ताः(फ्) पुनरं(ङ्)ग तासां(म्),

हीना मया कल्पसमा बभूवुः ॥ 11॥

अत्यंत प्रियतम असा मी वृंदावनामध्ये होतो, तेव्हा त्यांनी रास क्रीडेच्या रात्री, माझ्यासमवेत अर्ध्या क्षणाप्रमाणे घालविल्या होत्या. परंतु प्रिय उद्धवा! त्याच रात्री मी नसल्यामुळे त्यांना एकेका कल्पाप्रमाणे वाटू लागल्या.

ता नाविदन् मय्यनुषं(ङ्)गबद्ध-

धियः(स्) स्वमात्मानमदस्तथेदम् ।

यथा समाधौ मुनयोऽब्धितोये,

नद्यः(फ्) प्रविष्टा इव नामरूपे ॥ 12॥

माझ्याठायी मन- बुद्धी एकवटलेल्या त्यांना माझ्याविषयी आपले आप्तेष्ट, स्वतःचे शरीर, इहलोक, परलोक अशा कशाचीही शुद्ध राहिली नव्हती जसे मुनी समाधीमध्ये भगवंताशी एकरूप होऊन किंवा नद्या समुद्राला मिळून जाऊन आपले नामरूप विसरून जातात, तसे त्यांचे झाले होते.

मत्कामा रमणं(ञ्) जार- मस्वरूपविदोऽबलाः ।

ब्रह्म मां(म्) परमं(म्) प्रापुः(स्), सं(ङ्)गाच्छतसहस्रशः ॥ 13॥

त्या माझे खरे स्वरूप जाणत नव्हत्या. त्या मला फक्त प्रियतमच समजत होत्या आणि जारभावाने भेटण्याची इच्छा करीत होत्या. असे असूनही त्या शेकडो, हजारो स्त्रियांनी केवळ सत्संगाच्या प्रभावानेच परब्रम्ह अशा मला प्राप्त करून घेतले.

तस्मात्त्वमुद्धवोत्सृज्य, चोदनां(म्) प्रतिचोदनाम् ।

प्रवृत्तं(ञ्) च निवृत्तं(ञ्) च, श्रोतव्यं(म्) श्रुतमेव च ॥ 14॥

मामेकमेव शरण- मात्मानं(म्) सर्वदेहिनाम् ।

याहि सर्वात्मभावेन, मया स्या ह्यकुतोभयः ॥ 15॥

म्हणून, हे उद्धवा! तू विधि- निषेध, प्रवृत्ती किंवा निवृत्ती तसेच इह- परलोकासंबंधी सर्व कर्मांचा त्याग करून, सर्व प्राण्यांचा आत्मा असलेल्या एकमेव मला परमात्म्यालाच अनन्य भावाने शरण ये. मग तुला कोणत्याही प्रकारचे भय राहणार नाही.

उद्धव उवाच

संशयः(श्) शृण्वतो वाचं(न्), तव योगेश्वरेश्वर ।

न निवर्तत आत्मस्थो, येन भ्राम्यति मे मनः ॥ 16॥

उद्धव म्हणाला- हे योगेश्वरांचे ईश्वर ! आपला उपदेश ऐकून माझ्या मनात संशय उत्पन्न झाला आहे. तो असा "स्वधर्मानुसार मी कर्म करावे की, सर्व सोडून आपल्याला शरण यावे." यामुळे माझे मन गोंधळून गेले आहे.

श्रीभगवानुवाच

स एष जीवो विवरप्रसूतिः(फ्),

प्राणेन घोषेण गुहां(म्) प्रविष्टः ।

मनोमयं(म्) सूक्ष्ममुपेत्य रूपं(म्),

मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः ॥ 17॥

श्री भगवान म्हणाले -तो हा परमेश्वरच प्रथमच अनाहत नादस्वरूप परावाणी नावाच्या प्राणासह मुलाधार चक्रामध्ये प्रवेश करतो. नंतर तोच मनोमय सूक्ष्म रूप ग्रहण करून मणिपूर चक्रामध्ये पश्यंती नावाची वाणी होतो. नंतर तोच कंठ स्थानी असलेल्या विशुद्ध नावाच्या चक्रात येऊन मध्यमा नावाने वाणीचे किंचित स्थूल रूप धारण करतो. त्यानंतर तोच मुखामध्ये येऊन ह्रस्व- दीर्घ इत्यादी मात्रा, उदात्तादी स्वर आणि ककारादी वर्ण इत्यादी रूपांनी वैखरी नावाची स्थूलवाणी होतो.

यथानलः(ख्) खेऽनिलबन्धुरूष्मा,

बलेन दारुण्यधिमथ्यमानः ।

अणुः(फ्) प्रजातो हविषा समिध्यते,

तथैव मे व्यक्तिरियं(म्) हि वाणी ॥ 18॥

जसा आकाशात वाऱ्याचा मित्र अग्नी हा उष्णतेच्या रूपात असतो तो जोराने लाकडावर लाकूड घासले असता ठिणगीच्या रूपात प्रगट होतो नंतर तोच हविर्द्रव्य मिळाल्यानंतर प्रज्वलित होतो त्याचप्रमाणे या वाणीच्या रूपाने मीच प्रगट होतो.

एवं(ङ्) गदिः(ख्) कर्म गतिर्विसर्गो,

घ्राणो रसो दृक् स्पर्शः(श्) श्रुतिश्च ।

सङ्कल्पविज्ञानमथाभिमानः(स्),

सूत्रं(म्) रजः(स्)सत्त्वतमोविकारः ॥ 19॥

याचप्रमाणे बोलणे, कर्म करणे ,चालणे, मल-मूत्र विसर्जन करणे, वास घेणे, चव घेणे, पाहाणे, स्पर्श करणे, ऐकणे, मनाने संकल्प विकल्प करणे, बुद्धीने निश्चय करणे, अभिमान धरणे इत्यादी सर्व क्रिया, महत्तत्त्व, तसेच सत्व, रज, तम इत्यादी तिन्ही गुणांची कार्य, हे सर्व मीच आहे असे समज.

अयं(म्) हि जीवस्त्रिवृदब्जयोनि-

रव्यक्त एको वयसा स आद्यः ।

विश्लिष्टशक्तिर्बहुधेव भाति,

बीजानि योनिं(म्) प्रतिपद्य यद्वत् ॥ 20॥

यस्मिन्निदं(म्) प्रोतमशेषमोतं(म्),

पटो यथा तन्तुवितानसं(म्)स्थः ।

य एष सं(म्)सारतरुः(फ्) पुराणः(ख्),

कर्मात्मकः(फ्) पुष्पफले प्रसूते ॥ 21॥

त्रिगुणमय ब्रह्मांडरूपी कमळाचे कारण हा परमात्माच आहे.प्रथम तो एकच अव्यक्त होता.नंतर काल व माया यांच्या साह्याने तोच अनेक रूपांमध्ये प्रगट झाल्यामुळे अनेक असल्यासारखा वाटू लागला.जमिनीत बी पेरल्यानंतर ते जसे अनेक रूपांमध्ये विस्तार पावून प्रगट होते,तसे हे आहे.कपड्यामध्ये जसे धागेच ओतप्रोत असतात, त्याचप्रमाणे या परमात्म्यामध्येच सारे विश्व ओतप्रोत भरले आहे .हा पुरातन संसाररूपी वृक्ष कर्ममय आहे.  ते कर्मच भोग रूप फुले आणि मोक्षरूप फळ उत्पन्न करते.

द्वे अस्य बीजे शतमूलस्त्रिनालः(फ्),

पं(ञ्)चस्कन्धः(फ्) पं(ञ्)चरसप्रसूतिः ।

दशैकशाखो द्विसुपर्णनीडस्-

त्रिवल्कलो द्विफलोऽर्कं(म्) प्रविष्टः ॥ 22॥

अदन्ति चैकं(म्) फलमस्य गृध्रा,

ग्रामेचरा एकमरण्यवासाः ।

हं(म्)सा य एकं(म्) बहुरूपमिज्यैर्-

मायामयं(वँ) वेद स वेद वेदम् ॥ 23॥

पाप आणि पुण्य ही या संसाररूपी वृक्षाची दोन बीजे आहेत. शेकडो वासना या याच्या मुळ्या.  तीन गुण ही त्याची तीन खोडे. पंचमहाभूते या याच्या पाच फांद्या आहेत. यांमधून पाच प्रकारचे रस (शब्द, स्पर्श, रूप ,रस आणि गंध) बाहेर पडतात. दहा इंद्रिये आणि एक मन ह्याही त्याच्या फांद्याच होत. एक जीव आणि एक ईश्वर या झाडावर घरटे बांधून राहतात.वात, पित्त, कफ या याच्या तीन साली आहेत. सुख-दुःख ही दोन फळे होत. असा हा संसारवृक्ष सूर्यमंडलापर्यंत पसरलेला आहे. विषयलोलुप गृहस्थ या झाडाची दुःखरूप फळे खातात परंतु वनवासी संन्यासी याची सुखरूप  फळे खातात. एक असणारा मीच मायेमुळे अनेकरूप झालो आहे. हे श्रीगुरुंकडून जे लोक जाणून घेतात तेच वेदांचे रहस्य जाणणारे होत.

एवं(ङ्) गुरूपासनयैकभक्त्या
विद्याकुठारेण शितेन धीरः।
विवृश्च्य जीवाशयमप्रमत्तः(स्),
सम्पद्य चात्मानमथ त्यजास्त्रम् ॥ 24॥

हे उद्धवा! अशा प्रकारे, गुरूंची सेवा आणि अनन्य भक्तीने तू ज्ञानाची कुऱ्हाड धारदार कर आणि तिने सावधपणे आपला जीव भाव टाळून टाक. अशा रीतीने आत्मस्वरूप होऊन नंतर ती कुराड टाकून दे.

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायामेकादशस्कन्धे द्वादशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

